**नियमित फौजदारी खटला क्र. ०३/२०१३ मधील नि.१२५ वरील आदेश**

प्रस्तुत केस ही आरोपी क्र. १ ते ४ यांचेविरुध्द गुन्हा रजि.नं. २७/२०१६ मध्ये केलेल्या तपासाअंती दाखल पोलीस रिपोर्टवर आधारीत आहे. त्यामध्ये आरोपी क्र. १ व ४ यांचेविरुध्द भा.द.वि.क. ४२०, ४२३, ४६४, ४६५, ४६६, ४६८, ४७१ सह कलम ३४ अन्वये आरोप केलेले आहेत. आरोपीविरुध्द भा.द.वि.क. ४१९, ४२०, ४२३, ४६५, ४६६, ४६८, ४७१ सह कलम ३४ अन्वये दोषोरोप तयार करण्यत आलेले आहेत. ज्यामध्ये प्रस्तुत अर्ज हा अभियोग पक्षातर्फे दुय्यम पुरावा देणेची परवानगी मिळणेकरिता व खरेदीखताचे सहीसुद नकलेला पुराव्यामध्ये स्विकारण्यासाठी दाखल केलेला आहे.

०२. अभियोग पक्षातर्फे सादर अर्ज व त्यावर बचाव पक्षातर्फे दाखल करण्यात आलेले लेखी म्हणणे याचे अवलोकन केले.

०३. अभियोग पक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता व बचाव पक्षातर्फे विधिज्ञ श्री . एस.एस.सावंत यांचा युक्तीवाद ऐंकला.

०४. अभियोग पक्षातर्फे थोडक्यात असे कथन आहे की, प्रस्तुत प्रकरण हे पुराव्यासाठी प्रलंबित आहे. दि. २४ जानेवारी २००९ व दि. २८/०८/२००७ रोजीचे खरेदीखताचे दस्त क्रं. अनुक्रमे १३८/२००९ ११६०/२००७ असे आहेत. सदर वादग्रस्त खरेदीखते हे आरोपीचे ताब्यामध्ये आहेत. त्यामुळे सदरील दोन्ही मुळ खरेदीखत न्यायालयात दाखल करु शकत नाही. दि. १६/०५/२०१९ रोजी सरकारी पक्षातर्फे मुळ खरेदीखत आरोपीने हजर करावे म्हणून अर्ज सादर केला होता. परंतु सदर अर्ज न्यायाालयाने दि .१७ जुलै २०२३ रोजीचे आदेशान्वये फेटाळलेला आहे. त्याचप्रमाणे दोषारोपपत्रासोबत तपासी अधिका−यानी मुळ खरेदीखत दाखल केलेले नाही. परंतु सदरील खरेदीखताच्या सर्टिफाईड कॉपी दोषारोपपत्रासोबत दाखल केल्या आहेत.

०५. अभियोग पक्षाचे पुढील कथन असे आहे की , दोन्ही वादग्रस्त खरेदीखत ही नोंदणीकृत आहे. त्यामुळे सदर दोन्ही खरेदीखताच्या अनुषंगाने दुय्यम पुरावा म्हणून सहीसुद

नक्कला दाखल करण्याची परवानगी मिळावी व सदर सहीसुद नक्कलाना पुराव्याकामी निशाणी देण्यात यावी.

०६. बचाव पक्षातर्फे अर्जाला जोरदार हरकत घेण्यात आली. बचाव पक्षातर्फे असे कथन करण्यात आले की, दुय्यम पुरावा सादर करण्याकरिता प्रथमतः प्राथमिक नियम असा आहे की, मुळ दस्तऐवज आस्थित्वात असणे आवश्यक आहे. सदरचा मुळ दस्तऐवज प्रस्तुत प्रकरणी वादाचा विषय आहे. त्याचप्रमाणे प्रस्तुतची केस ही फौजदारी स्वरुपाची आहे . सदर प्रकरणी अभियोग पक्षाने त्यांची केस संशयापलीकडे शाबीत करणे आवश्यक आहे . मुळ दस्तऐवज आस्तीत्वात असलेबाबत शंका निर्माण केल्याने सर्टिफाईड कॉपींना दुय्यम पुरावा म्हणता येणार नाही. त्याचप्रमाणे भारतीय पुरावा कायदा कलम ६५ (ई) प्रमाणे ज्या कसोटया नमुद केल्या आहेत. त्या कसोटयामध्ये फिर्यादी अभियोग पक्षांचा अर्ज बसणारा नाही . सबब सदरचा अर्ज कायदेशिर नसल्याने नामंजुर करण्यात यावा अशी विनंती बचाव पक्षातर्फे करण्यात आली.

०७. बचाव पक्षांचे विधिज्ञ यांचे असे कथन आहे की , दुय्यम पुरावा सादर करण्याकरिता मुळ दस्ताऐवज आस्तीत्वात असणे जरुरीचे आहे त्याचप्रमाणे सदर दस्त हरवलेला असल्याचा पुरावा अभिलेखावर असणे आवश्यक आहे. वरील कथनाचे पृष्ठर्थ बचाव पक्षांचे विधिज्ञ यांनी मा. मुंबई उच्च न्यायालय यांनी श्री.सुरेश श्रीकृष्णा पंढरीतांबे विरुध्द पराग पदमाधर पंढरीतांबे या २०१६ (२) ऑल एमआर ५६३ मध्ये घोषित न्यायनिवाडयाचा आधार घेतलेला आहे. सदर न्यायनिवाडयाचे अवलोकन केले असता मा. मुंबई उच्च न्यायालयाने भारतीय पुरावा कायदा कलम ६५ च्या संदर्भाने दुय्यम पुरावा देण्यास परवानगी देणेकरिता कोणत्या बाबी विचारात घ्याव्या लागतील याचे विवेचन केलेले आहे त्याप्रमाणे दुय्यम पुरावा सादर करण्याची परवानगी मिळणेकरिता मुळ दस्त आस्तीत्वात होता असे दर्शविणारा पुरावा अभिलेखावर असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे सदर मुळ दस्त हा नष्ट झालेला आहे किंवा हरवलेला आहे याबाबत सुध्दा पुरावा असणे आवश्यक आहे . सदर न्यायनिवाडयाचे अवलोकन केले असता त्यामध्ये मुळ दस्तांची छायाकिंत प्रत दुय्यम पुरावा म्हणून सादर करण्यास परवानगी मिळणेसाठी अर्ज सादर करण्यात आला होता. परंतु प्रस्तुत प्रकरण विचारात घेता सहीसुद नक्कल दुय्यम पुरावा म्हणून स्वीकारावी म्हणून अभियोग पक्षाने अर्ज दिलेला आहे.

०८.  या ठिकाणी नमुद करणे गरजेचे आहे. भारतीय पुरावा कायदा कलम ७९ प्रमाणे कोणत्याही नोंदणीकृत दस्तांच्या सहीसुद नक्कलेला सदर सहीसुद नक्कल ही खरीखुरी असल्याबाबत गृहीतक आहे. त्याचप्रमाणे भारतीय पुरावा कायदा कलम ७४ प्रमाणे सार्वजनकि दस्तांची व्याख्या  दिलेली आहे त्याप्रमाणे खरेदीखत हे वैयक्तीक अधिकाराचे सार्वजनिक दस्त या सदरात मोडते. भारती पुरावा कायदा कलम ६५(ई ) प्रमाणे मुळ दस्त सार्वजनिक दस्त असून त्याबाबत दुय्यम पुरावा देता येवू शकतो. त्यामुळे खरेदीखताच्या अनुषंगाने दुय्यम पुरावा दयायचा असल्यास  सहीसुद नक्कल दुय्यम पुरावा म्हणून विचारात घेतले जावू शकते .  बचाव पक्षांचे विधिज्ञ यांनी सादर केलेल्या न्यायनिवाडयाचा त्यांना फायदा मिळू शकणार नाही कारण प्रस्तुत प्रलंबित प्रकरणाची परिस्थिती वर उल्लेखित न्यायनिवाडयामधील केसमधील परिस्थितीशी मिळतीजुळती नाही.

०९.  प्रस्तुत प्रकरणातील संचिकेचे अवलोकन केले असता तसेच अर्जातील नमुद कथने विचारात घेता आरोपीला मुळ खरेदीदस्त हजर करण्यास निर्देश देणेत यावेत असा अर्ज देणेत आला होता परंतु सदर अर्ज नामंजुर झालेला आहे. त्याचप्रमाणे प्रस्तुत केसमधील दोषारोपत्र न्यायालयात सादर करताना तपासा दरम्यान तपासी अधिकारी यांनी मुळ खरेदीखते ही जप्त केलेली नाही किंवा हस्तंगत केलेली नाहीत . सर्व सामन्यपणे पोलीस रिपोर्टवर आधारीत प्रकरणामध्ये तपासी अभिकारी यांचेमार्फतच आवश्यक पुरावा गोळा केला जातो व त्या संदर्भात अंतिम अहवाल न्यायालयात सादर केला जातो. प्रस्तुत केसमध्ये तपासी अधिकारी यांनी मुळ खरेदीखते हस्तंगत केलेली दिसून येत नाही व जप्त केलेली दिसून येत नाहीत. अशा परिस्थितीत सदर खरेदीखताच्या अनुषंगाने दुय्यम पुरावा म्हणून मुळ खरेदीखताच्या सहीसुद नक्कला हजर करण्यास परवानगी देणे योग्य वाटते. खरेदीखताची सहीसुद नक्कल ही मुळ दस्तांची प्रत असते त्यामुळे सदरचा पुरावा वेळेवर तयार करणेत आलेला आहे किवा नवीन पुरावा आहे असे म्हणता येत नाही. शासकीय दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदवलेल्या मुळ दस्तांच्या अनुषंगाने दस्त निष्पादीत झालेला असल्यास किंवा नोंदणीकृत झालेला असला तरच त्याची सहीसुद नक्कल प्राप्त होते किंबहुना नाही.

वरील सर्व बाबी विचारात घेता खरेदीखताच्या सहीसुद नक्कला दुय्यम पुरावा

म्हणून सादर करण्यास परवानगी अभियोग पक्षाला देणे योग्य वाटते . खरेदीखताच्या सहीसुद नक्कला दुय्यम पुरावा म्हणून पुराव्यात स्वीकारणेसुध्दा योग्य वाटते . सदर सहीसुद नक्कलेचे पुरावामुल्य काय असेल याबाबत न्यायनिर्णयाच्या वेळी निष्कर्ष नोदविला जावू शकतो. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. खरेदीखताच्या सहीसुद नक्कला दुय्यम पुरावा म्हणून सादर करण्यास याव्दारे परवानगी देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे सदर सहीसुद नक्कला पुराव्यामध्ये स्वीकारण्यात येत आहेत . खरेदीखताच्या सहीसुद नक्कलांना निशाणी देणेत यावी.

CHANDRAKANT NINGAPPA KUMBHAR
Digitally signed by CHANDRAKANT NINGAPPA KUMBHAR
Date: 2024.11.21 18:17:53 +0530

ठिकाण :– ओरोस
दिनांक :–१६/११/२०२४.

( अे.डी.तिडके )
अति.मुख्य न्यायदंडाधिकारी,
सिंधुदुर्ग–ओरोस.